# संहिता अध्ययन

- **अष्टांग आयुर्वेद**

| **चरक** | **सुश्रुत** | **अष्टांग हृदय / संग्रह** | **काश्यप** |
|---|---|---|---|
| 1. कायचिकित्सा | 1. शल्य | 1. काय | 1. कौमारभृत्य |
| 2. शालाक्य | 2. शालाक्य | 2. बाल | 2. कायचिकित्सा |
| 3. शल्य | 3. कायचिकित्सा | 3. ग्रह | 3. शल्य |
| 4. विषगरवैरोधिक प्रशमन | 4. भूतविद्या | 4. उध्र्वांग | 4. शालाक्य |
| 5. भूतविद्या | 5. कौमारभृत्य | 5. शल्य | 5. विषतंत्र |
| 6. कौमारभृत्य | 6. अगदतंत्र | 6. दंष्ट्रा | 6. भुततंत्र |
| 7. रसायन | 7. रसायन | 7. जरा | 7. अगदतंत्र |
| 8. वाजीकरण | 8. वाजीकरण | 8. वृष | 8. रसायनतंत्र |

- **श्लोक संख्या**

- चरक संहिता - 12000 (सूत्र - 9295)
- सुश्रुत संहिता - 100000
- अष्टांग संग्रह – 13000
- अष्टांग हृदय - 8000

- **व्याधि प्रकार**

- चरक - 3 - निज, आगन्तुज, मानस
- सुश्रुत - 4 - शारीरिक, मानासिक, आगंन्तुज, स्वाभाविक (स्वाभाविक व्याधि - क्षुत पिपासां जरा, मृत्यु निद्रा इत्यादी)
- वाग्भट - 2 - निज, आगन्तुज
- काश्यप - 3 - साध्य, असाध्य, याप्य
- हारित - 4 - कर्मज, दोषज, सहज, स्वाभाविक

# चरक संहिता प्रस्तावना

- **चरक संहिता रचयिता**

| **कार्य** | **आचार्य** | **काल** |
|---|---|---|
| मूल उपदेष्टा | आत्रेय पुनर्वसु | ई.पूर्व 1000 |
| तंत्रकर्ता / प्रणेता / संस्कर्ता | अग्निवेश | ई.पूर्व 1000 |
| प्रतिसंस्कर्ता / भाष्यकार | चरक | ई.पूर्व 2 रे शतक |
| द्वितीय प्रतिसंस्कर्ता / सम्पूर्णकर्ता / संपूरक / पूरक | दृढबल | ई.सन 4 थे शतक |

- चक्रपाणी अनुसार –
    - दृढबलद्वारा पूरित अध्याय = 41
    - चिकित्सास्थान मधील अध्याय क्रं 1 ते 8 आणि 14, 19, 21, 24, 25 हे एकुण तेरा अध्याय चरकांनी लिहले आहेत
    - त्याव्यतिरिक्त इतर 17 चिकित्सा अध्याय तसेच संपूर्ण सिद्धिस्थान आणि कल्पस्थान हे दृढबलाने लिहले आहेत.
    - पण अध्याय क्रं 25 मधील पुष्पिका (अंत)मध्ये त्या अध्यायाला दृढबलद्वारा पूरित आहे असे म्हणले आहे. आणि अध्याय क्रं 23 मधील पुष्पिकामध्ये त्या अध्यायाला चरकद्वारा पूरित म्हणले आहे.

- **स्थान – पर्यायी नावे**

- सूत्रस्थान – श्लोकस्थान / संग्रहस्थान / आशय / शिर:शुभम्
- निदानस्थान – व्याधिसंग्रह
- विमानस्थान – निग्रहस्थान / मानस्थान
- शारीरस्थान – आश्रयस्थान / आत्मनिश्चय स्थान (काश्यप)
- इंद्रियस्थान – अरिष्टस्थान
- चिकित्सास्थान – औषधयोगसंग्रह / उत्तमस्थल / उत्तमरहस्यस्थान / सुंदरस्थान / गुप्तस्थान

- **स्थान आणि अध्याय संख्या**

| स्थान | चरक | सुश्रुत | अष्टांग हृदय | अष्टांग संग्रह | काश्यप |
|---|---|---|---|---|---|
| सूत्रस्थान | 30 | 46 | 30 | 40 | 30 |
| निदानस्थान | 8 | 16 | 16 | 16 | 8 |
| विमानस्थान | 8 | X | X | X | 8 |
| शारीरस्थान | 8 | 10 | 6 | 12 | 8 |
| इंद्रियस्थान | 12 | X | X | X | 12 |
| चिकित्सास्थान | 30 | 40 | 22 | 24 | 30 |
| कल्पस्थान | 12 | 8 | 6 | 8 | 12 |
| सिद्धिस्थान | 12 | X | X | X | 12 |
| उत्तरतंत्र | X | 66 | 40 | 50 | X |
| खिलस्थान | X | X | X | X | 80 |
| एकुण अध्याय | 120 | 186 | 120 | 150 | 200 |

- चरक सूत्रस्थानाची रचना “सप्तचतुष्क” मध्ये केली आहे.
  1. भेषज चतुष्क 2. स्वस्थ चतुष्क 3. निर्देश चतुष्क 4. कल्पना चतुष्क
  5. रोग चतुष्क 6. योजना चतुष्क 7. अन्नपान चतुष्क (संग्रहणीय अध्याय 29 – 30)
  (trick - सप्तचतुष्क – BSNI KRiYA)

- **काल**
- चरक – ई. पूर्व 2 रे शतक - मनुस्मृति काल / शृंगकाल / मौर्यकाल
- सुश्रुत – याज्ञवल्क्य स्मृति काल

- **चरक संहिता मधील परिषद**
- एकुण – 7

| स्थान | अध्याय क्रं | अध्याय नाव | स्थान / ऋषि | विषय |
|---|---|---|---|---|
| सूत्रस्थान | 1 | दीर्घज्जीवितीय अध्याय | 53 ऋषि पार्श्वे हिमवत् शुभे | आयुर्वेद अवतरण |
| | 12 | वातकलाकलीय | 8 ऋषि – 8 प्रश्न | त्रिदोष सिद्धांत |
| | 25 | यज्जपुरुषीय | 9 आचार्य | विकार उत्पत्ति |
| | 26 | आत्रेय भद्रकाप्यीय | काशीपति वामक | रससंख्या |
| शारीरस्थान | 3 | खुड्डाक गर्भावक्रान्ति | 10 ऋषि चैत्ररथवन | मातृजादी षडभाव |
| | 6 | शरीरविचय शारीर | 8 ऋषि – 9 प्रश्न | गर्भोत्पत्तिमध्ये सर्व प्रथम अंग उत्पत्ति |
| सिद्धिस्थान | 11 | फलमात्रासिद्धि | 10 ऋषि | बस्तिद्रव्य संशोधन वर्णन |

- **संहिताचे अनुबन्ध चतुष्ट्य**
1) अभिध्येय – त्रिस्कंध
2) प्रयोजन – धातुसाम्य
3) संबन्ध - वाच्य वाचक लक्षण
4) अधिकारी – ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य

- **चतुर्विध सूत्र**
  1. गुरुसूत्र – उदा - नैतद बुध्दिमता द्रष्टव्यमग्निवेश |
  2. शिष्यसूत्र - उदा - नैतानि भगवन्, पंचशतानि पुर्यन्ते |
  3. प्रतिसंस्कर्तु सूत्र - उदा - तमुवाच भगवान आत्रेय |
  4. एकीय सूत्र - उदा - कुमारस्य शिरः पूर्वमभिनिर्वतन्ते इति कुमारशिरा भारद्वाज |

- **महर्षिभेद - 4**

- **पर्यायी नावे –**
- ब्रह्मा – पितामह
- इंद्र - शक्र, सहस्राक्ष, शचीपति, बलहन्तारं, सुरेश्वर, अमरप्रभू
- भारद्वाज - महामति, महातपा, उग्रतपा
- धन्वतरि – दीर्घतप
- आत्रेय पुनर्वसु – मैत्रीपर
- अग्निवेश – सौम्य
- आयुर्वेद विशेषण - अनंतपार, पुण्यतम, लोकयोरुभयोर्हितम्

# अध्याय 1 - दीर्घज्जीवितीय अध्याय

Similar अध्याय - सु.सू.1, अ.हृ.सू.1, अ.सं.सू.1,2

- लौकिक ग्रंथाची सुरुवात 'अथ' शब्दाने आणि वैदिक ग्रंथाची सुरुवात ॐ कार ने होते.

- **अथातो दीर्घज्जीवितीयमध्यायं व्याख्यास्यामः |**
- हे चरक संहितामधील सर्वात प्रथम सूत्र आहे.
- या सूत्रामध्ये 8 पद आहेत.
  1. अथ 2. अत 3. दीर्घ 4. जीवित 5. अध्याय 6. वि 7. आ 8. ख्यासाम

## आयुर्वेद अवतरण

- **आयुर्वेदाची आवश्यकता का पडली होती?**
  - विघ्नभूता यदा रोगाः प्रादुर्भूताः शरीरिणाम् | तपोपवासाध्ययनब्रह्मचर्यव्रतायुषाम् || - च.सु 1/6
    - कृतयुगामध्ये व्यक्तिंना तप, उपवास, अध्ययन, ब्रम्हचर्य, व्रत आणि आयु यावर विघ्न स्वरूप व्याधि जेंव्हा मानवी शरीराला त्रास देणे सुरु केले तेंव्हा व्याधि निर्मूलन करुन, निरोगी जीवन जगण्यासाठी आयुर्वेद शास्त्राची गरज भासु लागली.

- **आयुर्वेद अवतरणसाठी संभाषा परिषद**
  - तदा भूतेष्वनुक्रोशं पुरस्कृत्य महर्षयः | समेताः पुण्यकर्माणः पार्श्वे हिमवतः शुभे || - च.सु 1/7
    - तेंव्हा प्राणीमात्रांच्या काळजी पोटी अनेक महर्षि एकत्र आले होते.
    - स्थान – पार्श्वे हिमवत शुभे (इथेच आयुर्वेदावतरण विषयीची प्रथम संभाषा परिषद भरली होती.)
    - एकुण ऋषि संख्या – 53

  - धर्मार्थकाममोक्षाणामारोग्यं मूलमुत्तमम् | रोगास्तस्यापहर्तारः श्रेयसो जीवितस्य च ||
    प्रादुर्भूतो मनुष्याणामन्तरायो महानयम् | कः स्यात्तेषां शमोपाय इत्युक्त्वा ध्यानमास्थिताः ||
    अथ ते शरणं शक्रं ददृशुर्ध्यानचक्षुषा | स वक्ष्यति शमोपायं यथावदमरप्रभुः ||
    - धर्म, अर्थ, काम, मोक्ष यांचे मूल म्हणजे आरोग्य आहे. आणि रोग त्याचे व जीवनाचे हरण करतात. असे रोग मनुष्याला होत असताना त्याचे शमन करण्यासाठी काय उपाय आहेत हे शोधण्यासाठी ऋषि महर्षि धानस्थ झाले.
    - ध्यानस्थ असताना ज्ञानचक्षुद्वारे त्यांना समजले की इंद्राकडे शरण गेल्यावर ते यावरील शमन उपाय सांगतील.

  - कः सहस्राक्षभवनं गच्छेत् प्रष्टुं शचीपतिम् | अहमर्थे नियुज्येयमत्रेति प्रथमं वचः ||
    भरद्वाजोऽब्रवीत्तस्मादृषिभिः स नियोजितः |
    - (ऋषींच्या समोर अशी बिकट समस्या होती की) महाराणी शचीचा पती आणि सहस्राक्ष असणाऱ्या देवांच्या राजाच्या म्हणजेच इंद्राच्या निवासस्थानात (रोगप्रशमनाच्या उपायाविषयी) प्रश्न करण्यासाठी कोण जाईल. (ऋषींचे हे मनोगत समजून इतर कोणी बोलण्याच्या आधीच) सर्वात पहिल्यांदा भरद्वाज म्हणाले, या कामासाठी मला नियुक्त केले जावे. नंतर सर्व ऋषींनी इंद्राच्या जवळ जाण्यासाठी भरद्वाजांची योजना केली.

  - ब्रह्मणा हि यथाप्रोक्तमायुर्वेदं प्रजापतिः | जग्राह निखिलेनादावश्विनौ तु पुनस्ततः ||
    अश्विभ्यां भगवाञ्छक्रः प्रतिपेदे हि केवलम् | ऋषिप्रोक्तो भरद्वाजस्तस्माच्छक्रमुपागमत् ||
    - सर्वात प्रथम ब्रह्मदेवाच्या उपदेशानुसार दक्षप्रजापतिने संपूर्ण आयुर्वेदाचे ज्ञान प्राप्त केले. त्यानंतर अश्विनीकुमारांनी दक्षप्रजापतिकडून आणि इंद्राने अश्विनीकुमारांकडून संपूर्ण आयुर्वेदाचे ज्ञान प्राप्त केले. म्हणून ऋषीच्या सांगण्यानुसार भरद्वाज ऋषी इंद्राजवळ गेले

- **इंद्राकडून भरद्वाजांना आयुर्वेदाचा उपदेश –**
    - स शक्रभवनं गत्वा सुरर्षिगणमध्यगम् | ददर्श बलहन्तारं दीप्यमानमिवानलम् ||
      सोऽभिगम्य जयाशीर्भिरभिनन्द्य सुरेश्वरम् | प्रोवाच विनयाद्धीमानृषीणां वाक्यमुत्तमम् ||
      व्याधयो हि समुत्पन्नाः सर्वप्राणिभयङ्कराः | तद्ब्रूहि मे शमोपायं यथावदमरप्रभो ||
      तस्मै प्रोवाच भगवानायुर्वेदं शतक्रतुः | पदैरल्पैर्मतिं बुद्ध्वा विपुलां परमर्षये ||
        - भरद्वाजांनी देवराज इंद्राच्या भवनामध्ये जाऊन देव आणि ऋषींच्या मध्ये प्रज्वलित अग्नीप्रमाणे तेजस्वी आणि बल नावाच्या असुराचा नाश करणाऱ्या अशा इंद्राचे दर्शन घेतले. भरद्वाजांनी इंद्रासमोर जाऊन त्यांचा जयजयकार केला आणि आशीर्वचनांनी त्यांचे अभिनंदन केले. त्यानंतर भगवान भरद्वाजांनी ऋषींच्या संदेशाचे देवराज इंद्रासमोर अत्यंत उत्तम रीतीने (विनम्रता व आदरपूर्वक) कथन केले - 'सर्व प्राणधारींच्यामध्ये भय निर्माण करणारे रोग उत्पन्न झाले आहेत. म्हणून हे देवाधिदेव या रोगांच्या शमनासाठी यथोचित उपायांचा आपण मला उपदेश करा'. तेव्हा भगवान इंद्राने महर्षी भरद्वाजांच्या बुद्धीची विशालता जाणून अत्यंत थोड्या शब्दांत (सूत्ररूपाने) त्यांना आयुर्वेदोपदेश केला.

    - आयुर्वेदाचे त्रिसूत्रामध्ये वर्णन –
        - त्रिसूत्र – हेतु, लिंग, औषध
        - भरद्वाज ऋषि यांनी सम्पूर्ण आयुर्वेदाचे योग्य ज्ञान या त्रिसूत्रामधून ग्रहण केले. आणि भरद्वाजांनी या आयुर्वेदाच्या ज्ञानाने सुखमय दीर्घ जीवन प्राप्त केले.

- **पृथ्वीवर अवतरण**
    - भरद्वाजांनी काहीही न लपविता किंवा त्यात काहीही पदरचे न घालता पुनर्वसु इत्यादि इतर ऋषींना संपूर्ण आयुर्वेद शिकविला. दीर्घ जीवनाची इच्छा करणाऱ्या ऋषींनी - प्रजाहितकारी आणि आयुष्यवृद्धी करणारे - आयुर्वेदाचे ज्ञान भरद्वाजांकडून घेतले.
    - पश्चात् त्या महर्षींनी आपल्या ज्ञानचक्षूंनी षटपदार्थांचे जसेच्या तसे ज्ञान प्राप्त केले. हे ज्ञान प्राप्त झाल्यावर त्यांनी आयुर्वेदशास्त्रात सांगितलेल्या नियमांचे पालन (पथ्य-सेवन आणि अपथ्याचा त्याग) केले. त्यामुळे त्यांना अत्यंत सुखकर आणि दीर्घ जीवन प्राप्त झाले
    - त्यानंतर सर्व प्राणिमात्रांबद्दल आपुलकीचा भाव असल्यामुळे पुनर्वसु आत्रेयांनी सर्व प्राणिमात्रांवर कृपादृष्टी ठेवून पुण्यकारक कल्याण करणाऱ्या आयुर्वेदाचा उपदेश त्यांच्या सहा शिष्यांना केला.
    - पुनर्वसु आत्रेयांचे 6 शिष्य - 1. अग्निवेश, 2. भेल, 3. जतूकर्ण, 4. पराशर, 5. हारीत, 6. क्षारपाणि

- **आयुर्वेद तंत्र निर्मिती**
    - आत्रेय ऋषींनी जरी सर्वांना एकच उपदेश केला होता तरी त्यात काही फरक नव्हता, तरीसुद्धा शिष्यांच्या बुद्धीमध्ये अंतर (उत्कर्षापकर्ष) होते. अग्निवेश सर्वोत्कृष्ट बुद्धिमान असल्यामुळे तो आयुर्वेदशास्त्राचा पहिला तंत्रकर्ता झाला.
    - त्यानंतर भेलादी बुद्धिमान शिष्यांनी आपापल्या ग्रंथांची निर्मिती केली. त्यांनी ऋषी-समुदायामध्ये बसलेल्या आत्रेयऋषींना ऐकवले. पुण्यकारक, कल्याणकारक अशा शिष्यांच्या ग्रंथांमधील आवश्यक विषयांचा समावेश असलेले ऐकून ऋषींनी समाधान दाखविले आणि जसे पाहिजे तसे विषय सूत्रबद्ध केले असल्यामुळे त्या ग्रंथांना त्यांनी मान्यता दिली. त्यांना प्रमाणित केले.
    - सर्व प्राणिमात्रांच्या कल्याणाची इच्छा करणाऱ्या त्या सर्व ऋषींनी ग्रंथनिर्मात्यांची स्तुती केली. तुम्ही लोकांनी आयुर्वेद ग्रंथांची निर्मिती करून प्राण्यांवर दया केली, असे एकाच वेळी मोठ्या आवाजात म्हणून धन्यवाद दिले.
    - स्वर्गामध्ये असणाऱ्या देवर्षींनी आणि देवतांनी ऋषिंचे उच्च स्वरात दिलेले गौरवाचे शब्द ऐकले आणि ते खूप प्रसन्न झाले. सर्व प्राण्यांनी ही अति स्नेहयुक्त आणि गंभीर असा साधूवाद केला की, तीनही लोकांत त्याचा पडसाद उमटला. त्या वेळी मंद थंड वायूलहरी वाहू लागल्या, दाही दिशा प्रकाशित झाल्या. दंवबिंदूनी युक्त अशी दिव्य पुष्पवृष्टी होऊ लागली.
    - अग्निवेषादी तंत्रामध्ये अष्ट ज्ञानदेवतांनी प्रवेश केला. – बुद्धि, सिद्धि, स्मृति, मेधा, धृति, कीर्ति, क्षमा, दया (अष्टसिद्धि)
      (trick – बुद्धि मे सिद्धि + क्षमा की दया + धृति, स्मृति)

# आयुर्वेद वर्णन

- **आयुर्वेद व्याख्या**
- हिताहितं सुखं दुःखमायुस्तस्य हिताहितम् | मानं च तच्च यत्रोक्तमायुर्वेदः स उच्यते || - च.सू. 1/41
- आयुरस्मिन विद्यतेऽनेन वा आयुर्विन्दतीत्यायुर्वेदः | - सु.सू 1/15

- **आयु**
- व्याख्या - शरीरेन्द्रियसत्वात्मसंयोगो धारि जीवितम् | नित्यगश्चानुबन्धश्च पर्यायैरायुरुच्यते || - च.सू. 1/42
- पर्याय – धारि, जीवितम्, नित्यग, अनुबन्ध + (चेतनानुवृत्ति - च.सू. 30)
    - धारी - शरीरान् न पुतितां दन्तु न ददाति इति धारयति |
    - जीवित - प्राणान धारयति इति जीवितं |
    - नित्यग - नित्यं गच्छति इति |
    - अनुबंध - आयुः अपर पर शरीरादि संयोगरूप तव अनुबंध |

- **आयुर्वेद तन्त्राचे प्रयोजन**
- चरक –
    - धातुसाम्यक्रिया चोक्ता तन्त्रस्यास्य प्रयोजनम् | - च.सू. 1/53
    - प्रयोजनं चास्य स्वस्थस्य स्वास्थ्यरक्षणमातुरस्य विकारप्रशमनं च | - च.सू. 30/26
- सुश्रुत
    - व्याध्युपसृष्टानां व्याधिपरिमोक्षः स्वस्थस्य रक्षणञ्च | - सु.सू. 1/22

- **आयुर्वेदाचा उपदेश**
- आयुः कामयमानेन धर्मार्थसुखसाधनम् | आयुर्वेदोपदेषु विधेयः परमादरः || - अ.हृ.सू. 1/2
- आयुर्वेद हे इहलोक आणि परलोक या दोन्ही लोकांसाठी हितकर आहे. – च.सु 1

# आयुर्वेद सिद्धांत

- **त्रि**
- त्रिसूत्र / त्रिस्कंध – हेतु, लिंग, औषध
- स्कंधत्रय – हेतु, दोष, द्रव्य
- त्रिदण्ड –
    - सत्व आत्मा शरीर (सत्वात्माशरीरं च त्रयमेतत् त्रिदण्डवत् | लोकस्तिष्ठन्ति संयोगात्तत्र सर्व प्रतिष्ठितम् ||-च.सू 1/46)
- त्रिस्तंभ – वात, पित्त, कफ
- त्रयोपस्तम्भ – आहार, निद्रा, ब्रम्हचर्य (अ.हृ - अब्रम्हचर्य)
- त्रिदोष / त्रिस्थुण – वात, पित्त, कफ
- त्रिवर्ग – धर्म, अर्थ, काम

## ➢ षटपदार्थ

- **क्रम**
- चरक – सामान्य, विशेष, गुण, द्रव्य, कर्म, समवाय.
- वैशेषिक – द्रव्य, गुण, कर्म, सामान्य, विशेष, समवाय.

*1) द्रव्य*

- **परिभाषा** - यथाश्रितः कर्मगुणाः कारणं समवायी यत् | तत् द्रव्यं ||

- **मुख्य प्रकार – 2**
  I. कारण द्रव्ये –
    - कारण द्रव्य म्हणजे अशी द्रव्ये जे कोणापासून बनलेली नसतात पण त्यापासून इतर कार्य द्रव्ये बनतात.
    - संख्या – 9 - खादीन्यात्मा मनः कालो दिशश्च द्रव्यसंङ्ग्रहः |
  II. कार्य द्रव्ये –
    - कार्य द्रव्ये म्हणजे विविध कारणद्रव्ये एकत्र येवून बनलेली द्रव्ये.
    - इतर 2 प्रकार - सेन्द्रिय चेतनं द्रव्यं निरिन्द्रियम् अचेतनम् |
    - द्रव्यप्रकार

अ) प्रभाव भेदाने –

च.सू. 1/68 - दोषप्रशमनं, धातुप्रदुषणं, स्वस्थवृत्तिकर
अ.हृ.सु 1/16 - शमन, कोपन, स्वस्थहित

आ) उत्पत्ति भेदाने - जांगम, पार्थिव, औद्भिद्

**a) जांगम द्रव्ये**

- मधू, गोरसा (क्षीर), पित्त, वसा, मज्जा, असृग, मांस, विण, मूत्र, चर्म रेतस, अस्थि, स्नायु, शृंग, नख, खुर, केश, लोम, गोरोचन.
- 4 प्रकार – सुश्रुत
  - जरायुज - पशुमनुष्यव्यालादयोजरायुजाः
  - अण्डज – खगसर्पसरीसूपग्रभृतयो अण्डज:
  - स्वेदज – कृमिकिटपिपलिकाप्रभृतयः स्वेदज:
  - उद्भिज - मण्डूकभृतय उद्भिजा

**b) पार्थिव द्रव्ये**

- सुवर्ण, समलाः (मण्डूर), पंचलोहा, सिकता, सुधा, मनःशिला, हरताल, मणि, लवण, गैरिक, अञ्जन

**c) औद्भिद द्रव्ये (सुश्रुत – स्थावर द्रव्ये)**

- प्रकार - 4

| **औद्भिद द्रव्य प्रकार** | **लक्षण** | **स्थावर द्रव्य प्रकार** | **लक्षण** |
|---|---|---|---|
| 1. वनस्पति | फलैर्वनस्पति | 1. वानस्पत्य | **अपुष्पा: फलवन्तो वनस्पतय:** |
| 2. वानस्पत्य | **पुष्पैर्वानस्पत्यः फलैरपि** | 2. वृक्ष | पुष्पफलवन्तो वृक्षा: |
| 3. वीरुध | प्रतानवीरुध | 3. वीरुध | प्रातनवत्य: स्तम्बिन्यश्च वीरुध: |
| 4. ओषध | फलपाकान्ता | 4. ओषध | फलपाकनष्टा ओषधय इति |

(ओषध आणि औषधमध्ये फरक आहे. जसा स्वत: आणि सवत मध्ये आहे)

- **उद्भिज द्रव्यांचे प्रयोज्यांग – 18**
  - मूलत्वकसार निर्यास नाल स्वरस पल्लवा क्षारक्षीर फल पुष्प भस्म तैल कंटका पत्राणि शुङ्ग कन्द प्ररोहश्च

- **सजीव द्रव्य लक्षण – ऋग्वेद – 6** – अस्ति, जायते, वर्धते, विपरिणमते, अपक्षियते, म्रियते
- **मनुस्मृति** –
  - यात वनस्पतिमधील अंत:चेतनाचे सर्व प्रथम वर्णन आहे.
  - वनस्पतिमधील पंचज्ञानेन्द्रियचे वर्णन केले आहे.
  - तमोगुण जास्त असल्याने वनस्पतिमध्ये संवेदना होत नाहीत असे म्हणले आहे.

*2) गुण*

- **परिभाषा** - समवायी तु निश्चेष्टः कारणं गुण: |

- **प्रकार व संख्या** - सार्था गुर्वादयो बुद्धिः प्रयन्ताः परादयः |
  I. सार्थ – 5 - शब्द, स्पर्श, रूप, रस,गंध
  II. गुर्वादि – 20 – गुरूर्मंदहिमस्निग्धश्लक्ष्णसान्द्रमृदुस्थिरा | गुणाः ससूक्ष्मा विशदा विंशति विपर्ययाः ||
  III. बुद्ध्यादि – 6 - बुद्धि, सुख, दुःख, इच्छा, द्वेष, प्रयत्न
  IV. परादि – 10 - परापरत्वे युक्तिश्च संख्या संयोग एव च | विभागं पृथक्त्वं च परिणाम अथापि च | संस्कार अभ्यासश्चेति

### 3) *कर्म*

- **परिभाषा** – संयोगे च विभागेच कारणं द्रव्याश्रितम् | कर्तव्यस्य क्रिया कर्म नान्यदपेक्षते ||
  - प्रयत्नादि कर्म चेष्टितमुच्यते |

### 4) 5) - *सामान्य & विशेष*

- **वर्णन**
- सर्वदा सर्वभावानां सामान्यं वृद्धिकारणम् | ऱ्हासहेतुर्विशेषश्च प्रवृतिरूभयस्य तु || - च.सू. 1 / 44
- वृद्धि: समाने सर्वेषां विपरिते र्विपर्यय: | - अ.हृ.सु. 1/13

| **चक्रपाणीनुसार प्रकार** | **सामान्य / विशेष** | **सूत्र** | **उदाहरण** |
|---|---|---|---|
| 1. द्रव्य (अत्यंत सामान्य) | सामान्य | सर्वदा सर्वभावानां सामान्यं वृद्धिकारणं | मांसक्षयमध्ये मांससेवन |
| | विशेष | ऱ्हासहेतु: विशेषश्च | शंखशुक्ति भस्माने मांसक्षय |
| 2. गुण (मध्यम सामान्य) | सामान्य | सामान्यं एकत्वकरं | दुग्धाने शुक्रवृद्धि |
| | विशेष | विशेषस्तु पृथकत्व कृत | वातवृद्धिमध्ये तेलाभ्यंग |
| 3. कर्म (एकदेश सामान्य) | सामान्य | तुल्यार्थता हि सामान्यं | आरामाने कफवृद्धि |
| | विशेष | विशेषस्तु विपर्यय: | व्यायामाने कफक्षय |

### 6) *समवाय*

- **परिभाषा** - समवायोऽपृथग्भावो भूम्यादीनां गुर्णैमतः | स नित्यो यत्र हि द्रव्यं न तत्रऽनियतो गुणा: ||

## त्रिसुत्र

### 1) *हेतु*

- **रोगांचे त्रिविध हेतु**
- कालबुद्धिइन्द्रियार्थानां योगो मिथ्या न चाति च | द्वयाश्रयानां व्याधिनां त्रिविधो हेतुसंग्रहः || - च.सू. 1/54

- **द्विविध रोग आश्रय**
- शरीरं सत्वसंज्ञं च व्याधिनामाश्रयो मतः | - च.सू.1/55

- **आत्माला व्याधि का होत नाहीत?**
- आत्मा - चैतन्ये कारणं नित्यो द्रष्टा पश्यति हि क्रियाः | निर्विकार परस्त्वामा सत्वभूतगुणैन्द्रियेः || - च.सू. 1/56

- **दोष** –
- शारीर दोष संग्रह – वात, पित्त, कफ
- मानस दोष संग्रह – रज, तम
- दोष संग्रह - कुल 5

- शरीर दोष चिकित्सा – दैवयुक्तिव्यपाश्रयैः |
- मानस दोष चिकित्सा - ज्ञानविज्ञान धैर्यस्मृतिसमाधीभिः | - च.सू. 1/58

- **त्रिदोष गुण**
- क्रिया शारीरमध्ये वर्णन केले आहे.

### 2) *लिंग*

- विविध व्याधिंचे लक्षणे हे चिकित्सास्थान व निदानस्थान मध्ये वर्णन केले आहे.

### *3) औषध*

- **साध्यरोग सामान्य चिकित्सा** - विपरीत गुणै देशमात्राकाल भेषज
- **असाध्य रोग चिकित्सा** - साधनं न तू असाध्यानां व्याधिनाम्

- **रसवर्णन**

- रसयोनि – उदक
- रस आधार - आप + पृथ्वी (विशेष ज्ञानासाठी प्रधानहेतु)
- रस कारण द्रव्य - वायु + अग्नि + आकाश (अप्रधान हेतु)
- खादयस्त्रय: - विशेष प्रत्यया (विशेष ज्ञानार्थ) (उदा – पृथ्वी + जल → मधुर रस इत्यादी)

- **सामान्य औषध द्रव्यांचे वर्गीकरण**

- मूलिनी (16) फलिनी (19) महास्नेह (4), लवण (5), मूत्र (8), दुग्ध (8)

**A) मूलिनी द्रव्य = 16**

- वमनार्थ – 2 - बिम्बी (वचा), शणपुष्पी (हेमवति)
- नस्यार्थ – 2 – श्वेता, मालकांगणी (ज्योतिष्मती)
- विरेचानार्थ – 13 – इतर सर्व

**B) फलिनी द्रव्य = 19**

- वमनार्थ / आस्थापनार्थ – 8 – धामार्गव, इक्ष्वाकु, जीमुतक, कृतवेधन, मदन, कुटज, त्रपुष, हस्तिपर्णिनी
- नस्यार्थ – 1 – अपामार्ग
- विरेचनार्थ – 10 – इतर सर्व

- Confusing points

- हस्तिपर्णी – फलिनी हस्तिदंती – मूलिनी
- प्रत्यकपुष्पा – फलिनी, प्रत्यकश्रेणी – मूलिनी

**C) महास्नेह -** 4 – घृत, तेल, वसा, मज्जा

**D) लवण द्रव्य = 5**

- सैंधव, सौवर्चल, बिड, औद्भिद, सामुद्र
- सामान्य गुण – दीपनीय, आलेपन, स्नेहस्वेद विधिमध्ये, अभ्यंग, भोजन, शस्त्रकर्म, शिरोविरेचन, वर्ति, अंजन, उत्सादन, अजीर्ण, आनाह, वात, गुल्म, उदर शूल मध्ये उपयोगी

**E) अष्टदुग्ध**

- याचे वर्णन चरक सूत्रस्थान अध्याय 27 मध्ये केले आहे.

**F) अष्टमूत्र**

- मूत्र सामान्य लक्षण -
  - चरक – अरुक्षं, कटुकं लवणान्वितं, दीपनीय, पाण्डुरोगोपसृष्टानामुत्तमं, श्लेष्माणं शमयेत् पीतं, मारुतं च अनुलोमयेत, कर्षेत पित्तं अधोभागं
  - सुश्रुत – लवणानुरस, कफवातनुत
  - अष्टांग हृदय – लवणानुरस, पित्तलं, कफवातनुत्, श्वित्रनुत्

- मानुष मूत्र
  - सुश्रुत – विषापहम्
  - अष्टांग संग्रह – तिक्त पामाहरं ....... विषापहम्
  - भा.प्र – रसायन

| अष्टमूत्र | चरक (सूत्रस्थान 1) | सुश्रुत (सूत्रस्थान 45) | अ.हृ (सूत्र - 5) |
|---|---|---|---|
| 1. अवि (मेंढी) | - तिक्तरस<br>- स्निग्ध, पित्त अविरोधी | - सक्षार, तिक्त, कटु<br>- उष्ण, वातघ्न<br>- कास, श्वास, शोष, प्लीहोदर | - |
| 2. अजा / छाग (बकरी) | - कषाय, मधुर<br>- पथ्यं, दोषान्निहन्ति | - कटु तिक्तान्वित<br>- ईषत मारुत कोपनम्<br>- कास, श्वास, शोफ, कामला, पाण्डु रोगनुत | - कर्णपूरण – कर्णशूलजित |
| 3. गव्य | - किंचिद मधुर,<br>- दोषघ्न<br>- क्रिमीकुष्ठनुत, कण्डु, दोषोदर | - कटु, सक्षार<br>- तीक्ष्ण, उष्ण, कफवातनुत, पित्तलं, लघु, दीपन<br>- शूलगुल्मोदर अनाह, विरेक, अस्थापन | - पाचन, भेदन, दीपन |
| 4. माहिष | - सक्षार, सर<br>- अर्श शोफोदरघ्न | - दुर्नाम उदर शूल, मेह, अनाह, शोफ, गुल्म, पाण्डु | - |
| 5. हास्तिक (नाग) | - लवण<br>- क्रिमीकुष्ठनुत, विष, श्लेष्मामय<br>- प्रशस्त बद्धविणमूत्र, अर्श | - सतिक्त, लवण, क्षार<br>- तीक्ष्ण, भेदी, वातघ्न, पित्तकरं<br>- किलास | - किलास |
| 6. उष्ट्र / कारभ | - तिक्त<br>- श्वासकासघ्न, अर्शोघ्न | - शोफ, कुष्ठ, उदर, उन्माद, मारुत क्रिमी, अर्शोघ्न | - |
| 7. वाजी (अश्व) | - तिक्त, कटु<br>- कुष्ठ, व्रणविषापहम् | - कटु,<br>- तीक्ष्ण, उष्ण, दीपन, कफहरं<br>- कृमि, दद्रु | - किलास |
| 8. खर / गार्दभ | - अपस्मारोन्मादग्रह विनाशनम् | - गरविष, ग्रहणी, दीपन,<br>- तीक्ष्ण, कृमि, वातकफापहम्<br>- चेतो (मन) विकारघ्न | - क्रिमीन्मेह हन्ति |

## आयुर्वेद भिषक

- **औषधी ज्ञाता**
- अजपा, अविपा, गोपा (अजा, अवि, गो पालन करणारे)
- वनवासी (वनात राहणारे)

- **तत्वविद -** योगवित्त्वप्यरूपज्ञस्तासां तत्वविदुच्यते | - च.सू.1

- **उत्तम भिषक -** योगमासां तु यो विद्यातदेशकालोपपादितम् | पुरुषं पुरुषं वीक्ष्यं स ज्ञेयो भिषग् उत्तमम् || च.सू.1

- **श्रेष्ठ भिषक -** तदेव युक्तं भैषज्यं यदारोग्यायं कल्पते | स चैव भिषजां श्रेष्ठो रोगेभ्यो यः प्रमोचयेत् || - च.सू.1/134

- **इतर** –
- योगादपि विषं तीक्ष्णमुत्तमं भेषजं भवेत् | भेषजं चापि दुर्युक्तं तीक्ष्णं सम्पद्यते विषम् || - च.सू 1/126
  (अ.सं – तिल प्रमाणमध्ये विष (वत्सनाभ) हे अमृतासमान कार्य करते.)
- यथा विषं यथा शस्त्रं यथाग्निः शनिर्यथा | तथौषधं विज्ञातं अमृतं यथा || - च.सू.1
- इंद्राच्या हातातून सुटलेला वज्र जर मनुष्याच्या मस्तकावर पडला, तर त्यातून वाचणे कदाचित शक्य होऊ शकते; परंतु मूर्ख वैद्याने दिलेले औषध रोग्याचा नाशच करते, त्यातून वाचणे अशक्य आहे. – च.सु 1 / 128
-
- जो स्वतःला बुद्धिमान समजणारा वैद्य, औषधाचे ज्ञान नसतानाही, दुःखी व अचेत अवस्थेत पडलेल्या, वैद्यावर श्रद्धा ठेवणाऱ्या रोग्यास औषध देतो— असा धर्मत्यागी, विश्वासघाती, मृत्यूसमान प्रत्यक्ष यमस्वरूप, दुर्मती, अज्ञ, मूढ वैद्य याच्याशी बोलण्यानेही मनुष्य नरकगामी होतो; मग स्पर्श इत्यादींनी तर का होणार नाही? - च.सु 1 / 130

- वरमाशीविषविषं क्वथितं ताम्रमेव वा | पीतमत्यग्निसन्तप्ता भक्षिता वाऽप्ययोगुडाः ||
  नतु श्रुतवतां वेशं बिभ्रता शरणागतात् | गृहीतमन्नं पानं वा वित्तं वा रोगपीडितात् ||
  भिषग्बुभूषुर्मतिमानतः स्वगुणसम्पदि | परं प्रयत्नमातिष्ठेत् प्राणदः स्याद्यथा नृणाम्||

(सापाचे विष पिणे, किंवा तांबे उकळून पिणे, किंवा अग्नीत लाल केलेले लोखंडाचे गोळे खाणे हे जरी अधिक बरे असले, तरी वैद्याचा वेष धारण करून शरण आलेल्या रोग्याकडून अन्न, पाणी किंवा धन स्वीकारणे हे चांगले नाही.)

# अध्याय 2 - अपामार्ग तण्डुलीय

- **प्रस्तावना** -
- पंचकर्म या शब्दाचा सर्वप्रथम उपयोग चरक संहितामध्ये या अध्यायात आहे.
- अंत:परिमार्जन – या अध्यायामध्ये शरीराच्या आत सेवन कराव्या लागणाऱ्या द्रव्यांचे वर्णन आहे.

- **पंचकर्म द्रव्य संग्रह**

| पंचकर्म | द्रव्य संख्या | द्रव्य (pending) | योग्य अवस्था |
|---|---|---|---|
| 1. शिरोविरेचन | 25 | अपामार्ग बीज, शिरीष बीज, ज्योतिष्मती मूल, वचा (मधुर अम्ल वर्ज्य) | गौरवे शिरसः शुले पीनसेऽर्धावभेदके \| क्रिमीव्याधावपस्मारे घ्राणनाशे प्रमोहके \|\| |
| 2. वमन | 10 | पिप्पली, मधुक, निम्ब | उपस्थित श्लेष्मपित्ते व्यध्यावामाशयाश्रये \| |
| 3. विरेचन | 15 | वचा | पक्वाशयगते दोषे |
| 4. आस्थापन | 29 | दशमूल, कुलत्थ, स्नेह, लवण, कत्तृण | उदवर्ते विबंधेषु |
| 5. अनुवासन | 29 | Same | वातविकार |

- **विविध आचार्यांनुसार वर्णित यवागू संख्या -** चरक – 28 यवागू काश्यप – 21 यवागू भेल – 8 यवागू
- **यवागू दोष -** काश्यप, हारित – 7
- **चरकोक्त 28 यवागू (यात 22 यवागू + 6 पेया आहेत.)**

| यवागू | घटक | Trick |
|---|---|---|
| 1. दीपनीय / शूलघ्नी यवागू | पिप्पलीपिप्पलीमूलचव्यचित्रकनागरैः | पंचकोल |
| 2. पाचनी ग्राहिणी पेया | दधित्थबिल्वचांगेरीतक्रदाडिम | दात चांगले दाब |
| 3. वातविकारनाशक यवागू | पांचमुलिकी | लघुपंचमूल |
| 4. पित्तश्लेष्मातिसार नाशक पेया | शालपर्णीबलाबिल्वैः पृश्निपर्णी दाडिमाम्ला | पित्त-श्लेष्म (pair) → शालपर्णी-पृश्निपर्णी ; बला-बिल्व ; दाडिम – अम्ल |
| 5. रक्तातिसारघ्नी पेया | पयस्य अर्धोदके च्छागे ह्रीबेरोत्पलनागरैः \| पृश्निपर्णी | |
| 6. आमातिसारनाशक पेया | अतिविषा अम्ला सनागराम् | आमातिसार (आम – अम्ल, सा – सुंठ, आमति - अतिविषा) |
| 7. मूत्रकृच्छ नाशक पेया | श्वदंष्ट्रा कंटकारी सफाणिताम् | **मूत्रकृच्छ्र** |
| 8. क्रिमिघ्नी यवागू | विडंगपिप्पलीमूलशिग्रु मरीच तक्रसिद्धा ससुवर्चिका | तम शीघ्र वरची मूल विडंग |
| 9. पिपासाघ्नी यवागू | मृद्विकासारिवालाजपिप्पलीमधुनागरैः | नाम – पिले मृदसार |
| 10. विषघ्नी यवागू | सोमराजी विपचिता | सोम (औषधांचा राजा), सोमराजी (बाकुची?) |
| 11. कर्शनीय यवागू | गवेधुकानां भृष्टानां समाक्षिका | |
| 12. बृंहणी यवागू | सिद्ध वराहनिर्युहे | डुकरासारखा पुष्ट |
| 13. स्नेहनी यवागू | सर्पिष्मती बहुतिला स्नेहनी लवणान्विता | |
| 14. विरुक्षणी यवागू | कुशामलकनिर्यूहे श्यामकानां | श्याम को आमलकी |
| 15. कासहिक्काश्वास कफहर | दशमुली | |
| 16. पक्वाशयरुजाहर यवागू | यमके मदिरासिद्धा | |
| 17. रेचनी यवागू | शाकैर्मांसैः तिल्वैर्माषैः | |
| 18. सांग्रहकी यवागू | जम्ब्वाम्रास्थिदधित्थाम्लबिल्वैः | |
| 19. भेदिनी यवागू | क्षारचित्रकहिंगू अम्लवेतस | अक्षा चि हिंगू भेद करते |
| 20. वातानुलोमिनी यवागू | अभयापिप्पलीमूलविश्वैः | पिप्पलीचा मूल न भीता विश्वासमोर गैस सोडतो |
| 21. घृतव्यापत्ति नाशक यवागू | तक्रसिद्धा | |
| 22. तेलव्यापत्ति नाशक यवागू | तक्रपिण्याक साधित | |
| 23. विषमज्वर नाशक यवागू | गव्यमांसरसैः साम्ला | गाईचे मासं – आंबट – किती विषम ना |
| 24. कंठ्य यवागू | यवानां यमके पिप्पल्यामलकैः | |
| 25. रेतोमार्ग रुजा यवागू हर | ताम्रचुडरसे सिद्ध | |
| 26. वृष्य यवागू | समाषविदला घृतक्षीरोपसाधिता | |
| 27. मदविनाशक यवागू | उपोदिकादधिभ्याम् | |
| 28. क्षुधारोगनाशक यवागू | अपामार्ग क्षीर गोधारसैः | येताना मार्गात गोधारस पिलो म्हणून क्षुधा नाश झाली. |

- **युक्ति महत्व** - मात्राकालश्रया युक्तिः सिद्धिर्युक्ति प्रतिष्ठिता | (चिकित्सासिद्धिचे आधार युक्ति आहे.) – च.सू 2/16
- **चिकित्सकाचे गुण** - स्मृतिमान् हेतुयुक्तिज्ञो जितात्मा प्रतिपत्तिमान् भिषगौषधसंयोगै | - च.सु. 2/36

# अध्याय 3 : आरग्वधीय

Similar अध्याय - सु.सू. 18, शा.उ. 18

- **प्रस्तावना**
- बहि:परिमार्जन - या अध्यायामध्ये बाह्य क्रियांसाठी लागणारे द्रव्यांचे वर्णन आहे.
- या अध्यायामध्ये एकुण 32 सिद्धतम लेपांचे वर्णन आहे.
- त्यापैकी 6 उष्ण + 26 शीत लेप आहेत.
- एकुण 32 लेपमध्ये 1 स्वेदहर प्रहर्ष आहे.

- **कुष्ठहर** – सिद्धतम 6 कुष्ठहर योगामध्ये गोपित्त (गोरोचन)ची भावना दिली आहे.
- आरग्वध –
  - बाह्य प्रयोगार्थ श्रेष्ठ – चरक (अभ्यंतर प्रयोगार्थ – खदिर श्रेष्ठ – अग्र्य द्रव्य संग्रह)
  - कोष्ठशुद्धिकरं परम् | - भा.प्र.
- मनःशिलादि लेप - परं कुष्ठनिसुदनाय (उत्तम) - तैलमार्क पयः |
- मन:शिलादि लेप (द्वितीय) - तुषोदकेन एवं पलाशनिर्दाहरसेन - एक आढक
- करंजादि लेप - परः प्रदेहः - गोमूत्र पिष्ट
- कुष्ठादि लेप - तैलतक्रपिष्टे, तैलाक्तउव्दर्त
- कुष्ठादि चूर्ण - मनशिलाले - तैलाक्तगात्रस्य

- **वातहरयोग** – 4
  1. वेशवार
  2. द्वितीय वातनाशक - चतुस्नेह, दशमूल, गंधौषध
  3. कोलादि
  4. वातव्याधिहर

- **कोलादि लेप** - यवचुर्ण एवं अम्ल द्रव्य
- **उदरशूलनाशक** - तक्रेण युक्तं यवचुंर्ण सक्षारं

- **वातरक्तहर** – 3
  1. रास्नादि गुडूची मधुकं
  2. शताव्हा मधुकं मधूकं बला
  3. गोधूमादि (छागपय युक्त)

- **शिरशूलहर** - प्रपौण्डरिकादि, लोहादि, नतोत्पल
- **पार्श्वशूलनाशक** - रास्ना हरिद्रे नलदं सतैलमालेपनम
- **रसरांजनादि लेप** - कपित्थेन रसेन
- **दाहशामक** – 2
  1. शैवालादि
  2. सितालतावेतसपद्मकानि

- **शीतनाशक** – शैलेय
- **विषघ्न** - शिरीष ससिंधुवार
- **स्वेदहर** - शिरीष लामज्जक
- **दुर्गन्धनाशक** – पत्रादि लेपं

# अध्याय 4 : षड्विरेचनशताश्रितीय

Similar अध्याय - सु.सू.38,39,  अ.हृ.सू. 15,  अ.सं.सू.14,15,16

## प्रस्तावना

| | संख्या | Description | |
|---|---|---|---|
| विरेचन योग | षडविरेचनशतानि = 600 | मदनफल – 133<br>जीमुतक – 39<br>इक्ष्वाकु – 45<br>धामार्गव – 60<br>वत्सक – 18<br>कृतवेधन – 60 | श्यामात्रिवृत्त – 110<br>चतुरंगुल – 12<br>लोध्र – 16<br>स्नुही – 20<br>सप्तला शंखिनी – 39<br>दन्तीद्रवन्ति – 48 |
| विरेचन आश्रय | षडविरेचनाश्रय = 6 | क्षीरमूलत्वकपत्रपुष्पफलानिति \| | (यात निर्यास, सार नाहीत.) |
| शिरोविरेचन आश्रय | 7 | | |
| कषाय योनि | पञ्चकषाययोनि = 5 | लवण व्यतिरिक्त इतर 5 रसांचे कषाय (क्काथ) | |
| महाकषाय | पञ्चशन्महाकषाय = 50 | | |
| कषाय | पञ्चशतानिकषाय = 500 | | |

- पञ्चविधकषाय कल्पना
    1) स्वरस
    2) कल्क
    3) श्रृत
    4) शीत
    5) फांट
- यांच्या व्याख्या भैषज्य कल्पना मध्ये दिल्या आहेत.
- चरक - स्वरसं कल्क श्रुत शीत फाण्ट कषाय कल्पना | तेषां यथा पूर्वं बलाधिक्यम् ||
- सुश्रुत - क्षीर स्वरस कल्क श्रुत शीत फाण्ट कषाय कल्पना || उत्तरोत्तर लघु
- पंचकषाय कल्पना हे व्याधिबल एवं आतुरबलाची अपेक्षा ठेवतात.

## महाकषाय वर्णन

- चरक - 50 महाकषायांचे वर्णन लक्षण एवं उदाहरण स्वरूपामध्ये केले आहे.

- अष्टांग संग्रह – 45 महाकषाय
- तृप्तिघ्न महाकषाय – चरक आणि अष्टांग संग्रह दोन्हीमध्ये पूर्ण श्लोक same. इतर महाकषायमध्ये क्रम थोडा मागे पुढे आहे. काही महाकषाय मध्ये १-२ द्रव्ये वेगळी सांगितली आहेत. जे वेगळी सांगितली आहेत ते त्या त्या महाकषायच्या खाली लिहले आहेत. चरकोक्त वमनोपग, विरेचनोपग, अस्थापनोपग, अनुवासनोपग, शिरोविरेचनोपग हे पाच महाकषाय अष्टांग संग्रहमध्ये वर्णिले नाहीत.

| | |
|---|---|
| जीवनीय | जीवकर्षभकौ मेदामहामेदा काकोलीक्षीरकाकोली मुद्गपर्णीमाषपर्ण्यौ जीवन्तीमधुकम् (१) |
| | 5 pairs |
| शुक्रजनन | जीवकर्षभक काकोलीक्षीरकाकोली मुद्गपर्णीमाषपर्णी मेदा वृद्धरुहाजटिलाकुलिङ्गा (१९) |
| | 3 pairs मेदा, (महामेदा नाही म्हणजे जाडी बाई नाही), |
| स्नेहोपग | मृद्वीका मधुकमधुपर्णी मेदाविदारी काकोलीक्षीरकालोली जीवकजीवन्ती शालपर्ण्य (२१) |
| | मनुका (मृद्विका) खावुन मधुक → मधुपर्णी झाला, तसेच काकोली→ क्षीरकाकोली, जीवक → जीवन्ती, मेदा → विदारी झाली. Shall I (शालपर्णी) |
| बृंहणीय | क्षीरिणी राजक्षवकाश्वगन्धा काकोलीक्षीरकाकोली वाट्यायनीभद्रौदनी भारद्वाजीपयस्यर्ष्यगन्धा (२) |
| | भद्रौदनीसाठी त्याच्या राजसेवकाने (राजक्षवक) दुधामध्ये (पयस्या) काकोली-क्षीरकाकोली, अश्वगंधा व ऋष्यगंधा वाटुन वाटुन (वाट्यायनी) घातले व त्यात भारद्वाजीचे दूध (क्षीरीणी) मिसळून दिले. त्याने भद्रौदनी राजाचे बृंहण झाले. |
| | अष्टांग संग्रह – ऋष्यगंधाच्या ऐवजी इक्षु सांगितले आहे |
| बल्य | ऐन्द्री ऋषभि अतिरस ऋष्यप्रोक्ता पयस्या अश्वगन्धा स्थिरा रोहिणी बला अतिबला (७) |
| | इंद्र, ऋषभिने सांगितले (ऋष्यप्रोक्ता) म्हणून स्थिर अश्या रोहिणीने दुधामध्ये (पयस्या) अश्वगंधाचा अतिरस मिसळून पिले. याने तिचे बल हे अतिबल झाले. |
| प्रजास्थापन | ऐन्द्री ब्राह्मी शतवीर्या सहस्रवीर्याऽमोघाऽव्यथाशिवाऽरिष्टा वाट्यपुष्पी विष्वक्सेनकान्ता (४९) |
| | ही प्रजा कशी निर्माण झाली ? – ब्रम्हा, इंद्र, शिव आणि विष्णु (अमोघ) यांनी ही जबाबदारी विष्वक्सेनकांताला सांगितली. त्याने शतवीर्य आणि सहस्त्रवीर्य वाटुन अव्यथा आणि अरिष्ट असे प्रजा निर्माण केले |
| वय:स्थापन | अमृताऽभयाधात्रीमुक्ता श्वेताजीवन्त्यतिरसा मण्डूकपर्णी स्थिरापुनर्नवा (५०) |
| | मृत्युच्या भयापासून (अभया) मुक्त (मुक्ता) व्हा आणि अमृत (अमृता) जीवन (जीवन्ती) जगा – by श्वेताधात्री – स्थिर होवून पुन्हा नव्याने (पुनर्नवा) जगण्यासाठी मंडूकपर्णीचा अतिरस प्या. |
| दीपन | पिप्पलीपिप्पलीमूलचव्यचित्रकशृङ्गवेर अम्लवेतस मरिच अजमोदा भल्लातकास्थि हिङ्गुनिर्यास (६) |
| | पंचकोल + मरीच = षडूषण ; षडूषणच्या ABHA (आभा) ने सुद्धा अग्निदीपन होते. |
| शूलप्रशमन | पिप्पलीपिप्पलीमूलचव्यचित्रकशृङ्गवेर मरिच अजमोदा अजगन्धा अजाजी गण्डीर (४५) |
| | षडूषण + अज्जा आजी आज गंदी |
| संधानिय | मधुक मधुपर्णी पृश्निपर्ण्यम्बष्ठकी समङ्गा मोचरस धातकी लोध्र प्रियङ्गु कट्फल (५) |
| | घातकी (धातकी) लोध्र ने प्रियंगुला गोडगोड (मधुक, मधुपर्णी), बोलून अम्बष्ठकीला नेले व प्रेमाचा प्रश्न (पृश्नीपर्णी) विचारला. ते ऐकून तिचा तोल गेला आणि some अंगाला (समंगा) मोच (मोचरस) आली. तेंव्हा त्याने कोणतेतरी फल कट (कटफल) करून संधान केले. |
| | अष्टांग संग्रह – मधुपर्णीच्या ऐवजी मधु सांगितले आहे. |
| पुरीषसङ्ग्रहणीय | प्रियङ्ग्वनन्ता आम्रास्थि कट्वङ्ग लोध्र मोचरस समङ्गा धातकीपुष्प पद्मा पद्मकेशर (३१) |
| | घातकी लोध्रने प्रियंगुला some अंगाला मोच आल्यावर कोणते फल कट करून लावले ? आम्रअस्थिचे. त्याने असे झाले की पुढे अनंत (अनंता) काळपर्यंत तिला टॉयलेटला बसता आले नाही. म्हणजे पुरीषचे संग्रहण झाले. मग तिचे आई पद्मा आणि वडिल पद्मकेशर यांनीच सगळी काळजी घेतली. |
| शोणितस्थापन | मधुमधुक रुधिर मोचरस मृत्कपाल लोध्र गैरिक प्रियङ्गु शर्करा लाजा (४६) |
| | प्रियंगुच्या मोचमधून पुन्हा रक्त (रुधिर) येवू लागल्याने ती पुन्हा लोध्राकड़े आली. मग लोध्रने गैरिकपासून बनवलेले मृत्कपाल त्यावर लावले. ते पाहून प्रियंगु साखरेप्रमाने (शर्करा) गोडगोड (मधु मधुक) लाजली. |
| मूत्र विरजनीय | पद्म-उत्पल-नलिन-कुमुद-सौगन्धिक-पुण्डरीक-शतपत्र मधुक प्रियङ्गु धातकीपुष्प (३४) |
| | आता लघवी रंगली जाईल असा twist सांगू का? खरी घातकी गोड वाटणारी प्रियंगु आहे. कारण ती कमळाच्या सप्तरंगाप्रमाणे रंग बदलते. |
| वेदनास्थापन | शाल कट्फल कदम्ब पद्मक तुम्ब मोचरस शिरीष वञ्जुल एलवालुक अशोक (४७) |
| | शिरीष व त्याची gf कदम्बा वंज्जुले अशोक वनात फिरायला गेल्यावर तिथे तिचा पाय वारुळमध्ये (एलवालुक) अडकतो. तेथील तुडूम्ब (तुम्ब) प्रमाणात असलेल्या मुंग्या तिला चावतात. त्याने तिला मोच आणि आणि वेदना सुरु झाल्या. त्यावर शिरीषने पद्मक पत्र गुंडाळून तिच्या वेदना कमी केल्या. |
| | अष्टांग संग्रह – तुम्बच्या ऐवजी नागकेशर सांगितले आहे. |